<u>नियमित दिवाणी दावा क्र. १७५/२०२३ मधील नि.क्र. ७७ वरील आदेश</u>

(CNR NO. MHRG140022372023)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. २ ते ६ व ९ यांनी त्यांस दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे देवून हरकत घेतलेली आहे. वादींचे असे कथन आहे की, सदरच्या अर्जाचेकामी विलंब माफ करण्याचे आदेश झाल्यास विलंब शुल्क आकारणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हक्कप्रस्थापनेकरीता, ठरावाकरीता, वाटपाकरीता, हिस्सा निरतुटक करणेकरीता दाखल केला आहे. सदरहू प्रतिवादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे विविध ठिकाणी राहत असून एकत्रीतपणे दावयाचे कामी वकीलांना माहिती देणे व न्यायालयात उपस्थित राहत शक्य न झाल्याने कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी देणयात यावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

५. सदर प्रतिवादी  हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करत असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या

टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादींना झालेला विलंब माफ करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य होईल. सदर प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत विलंबाने दिली असल्यामुळे जो असोइस्करपणा झाला त्याकरीता सदर प्रतिवादी यांस खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल. करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | सदरचा अर्ज रक्कम रु. २५०/– च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र. २ ते ६ व ९ यांनी खर्चाची रक्कम रु. २५०/– वादी यांना द्यावी. |
| ३. | सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. २ ते ६ व ९ पुढील नेमल्या तारखेच्या आत वादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

NILESH MALAKAPPA WALI

Digitally signed by NILESH MALAKAPPA WALI
Date: 2024.05.03 17:39:25 +0530

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक – ०३.०५.२०२४ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.